**<u>नि.फौ.ख.क्रं. १३८/२०२२</u>** **<u>निशाणी क्र. ३०</u>**
**<u>शासन .वि. राजु जांभुळकर व इतर</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०२ ची शपथेवर जबानी**

.......

**माझे नांव** – सुकरु मलबाजी मुंढरे
**वय** – ५७ वर्षे, धंदा – काही नाही,
**राहणार** – पिंपळगांव, ता. चिमूर व जि. चंद्रपूर.

.......

**<u>सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत</u>**

**१.** मी सर्व आरोपींना ओळखतो. सर्व आरोपी दिग्रजला राहणारे आहेत, मी दिग्रजला पहिले राहत होतो. घटना हि सन २०२२ मधील आहे. पिंपळगांववरुन भांडे नेण्यासाठी मी, माझी सुन व ड्रायव्हर निलकंठ मिळुन सागर देवतळे यांच्या घरी आलो होतो. मी घरामध्ये गहु भरत असतांना मागुन राजु जांभुळकर व उमेश आले व त्यांचे वडिल बाहेर होते. त्यांनी आतमध्ये येवुन मला मारण्यास सुरुवात केली. उमेशच्या हातामध्ये काडी होती व राजुच्या हातात बाजेचा गाथ होता. आरोपींनी सदरच्या काडीने व गाथेने डोक्यावर, उजव्या पायावर व उजव्या खांद्यावर मारले. त्यानंतर मी बेहोश झालो. त्यानंतर काय झाले हे मला माहित नाही. घटनेच्या वेळी फिर्यादी तेथे हजर होती. आरोपी उमेश व राजुने ज्या काडीने व गाथेने मला मारहाण केली ते पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला गुन्हयातील जप्त काडी व गाथा दाखविण्यात आले. ते तेच असुन सदरील काडी व गाथा **<u>आर्टिकल–अ</u>** वर आहे. आरोपींनी मला मारल्यामुळे माझे रक्त निघाले होते, मला होश आला तेव्हा मी सेवाग्राम हॉस्पीटलला होतो. दवाखान्यात माझे रक्ताचे नमुने घेण्यात आले होते. मला जप्त केलेले कपडे दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला दाखविलेल्या कपड्यांपैकी माझे कपडे मी ओळखतो. ते तेच आहे. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. कपडे सोबत दाखल असलेले काळया रंगाचा शर्टच्या टॅगला आर्टिकल–क, फुलपॅंट ला आर्टिकल–ड, अंडरवेअरला आर्टिकल–ई व बनियानला आर्टिकल–फ देण्यात आला. ज्या आरोपींनी मला मारहाण केली

होती ते आज रोजी न्यायालयात हजर आहे.

<u>सरतपास संपला</u>

<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ व्ही.बी.गोमासे यांच्या मार्फत :</u>

२. मी घटनेच्या बारा महिन्यापुर्वी दिग्रजचे घर सोडले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी सुन माझ्या सोबत राहत होती, आता ही सुन माझ्या सोबत राहते. सुन माझी पूर्ण देखभाल करते. आज ही मी न्यायालयात सुनेसोबत आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुनेच्या सांगण्यावरुन मी साक्ष देण्यासाठी आज आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी सकाळी १०.०० वाजता पिंपळगाववरुन निघालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, गाडीत बसतांना मी अडखडत होतो.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ ची पत्नी माझ्या मुलासोबत घटनेच्या पुर्वी पळुन गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या घटनेमुळे आमच्यात व आरोपींमध्ये वाद चालु होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या पुर्वीपासुन आरोपींसोबत बोलणे चालणे बंद होते. हे म्हणणे खरे आहे की, अक्षय बेले व सागर देवतळे यांच्या सोबत चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी फिर्यादी घराच्या बाहेर होती. हे म्हणणे खरे आहे की, दिग्रज मध्ये दवाखाना आहे. दिग्रज ते सिंदी मध्ये अंतर पाच ते दहा मिनिटांचा आहे व तेथे ही दवाखाना आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिग्रजमध्ये हि मला बरेच लोक ओळखतात. हे म्हणणे खरे आहे की, मी दिग्रज येथे जेथे राहत होतो तेथे ही आजुबाजुंचे लोकांशी माझे चांगले संबंध आहे.

४. मी पोलीसांना बयान देतांना पिंपळगांववरुन भांडे नेण्यासाठी मी, माझी सुन व ड्रायव्हर निलकंठ मिळुन सागर देवतळे यांच्या घरी आलो होतो, मी घरामध्ये गहु भरत असतांना मागुन राजु जांभुळकर व उमेश आले व त्यांचे वडिल बाहेर होते, त्यांनी आतमध्ये येवुन मला मारण्यास सुरुवात केली, घटनेच्या वेळी फिर्यादी तेथे हजर होती, हे सांगितले होते, परंतु पोलीसांनी माझ्या जबाबात का नमूद केला नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, काडया शेतक–यांकडे उपलब्ध असु शकतात. हे म्हणणे खरे आहे की, कपडे व काडया (आर्टिकल–अ ते क) आज रोजी मी पहिल्यांदाच

न्यायालयात पाहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, कपडे व काडया ओळखण्यासाठी मला पोलीसांनी बोलविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कुठल्याही प्रकारची मारहाण केली नाही. पोलीसांनी माझे बयान मी दवाखान्यातुन घरी आल्यावर २५ दिवसांनी नोंदविले. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सांगितल्याप्रमाणे आरोपींनी मला मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी गाडीत बसतांना अडखडुन पडलो व त्याचा गैरफायदा घेवुन आरोपींविरुद्ध फिर्यादीला खोटी तक्रार दाखल करण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बयानात मी सर्व खोटं सांगत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.04.20 16:03:09 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : २०/०४/२०२६